महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक २३/०९/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.सीटीई २६१८/प्र.क्र.८५/पोल-३, दि.२० सप्टेंबर २०२४

**विषय :-** पोलीस आयुक्त,नागपूर शहर यांच्या आस्थापनेवरील पोलीस स्टेशन पारडी,वाठोडा व कपिलनगरकरीता नव्याने निर्माण केलेल्या ३३५ अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.सीटीई-२६१८/प्र.क्र८५/पोल-३, दि.२० सप्टेंबर २०२४ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०९२०१६१८२७५३२९असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
पोलीस आयुक्त, नागपूर शहर
कार्यासन अधिकारी, का.क्र. २६-ब

प्रत,
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "आस्थापना " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**पोलीस आयुक्त,नागपूर शहर यांच्या आस्थापनेवरील पोलीस स्टेशन पारडी,वाठोडा व कपिलनगर करिता नव्याने निर्माण केलेल्या ३३५ अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सीटीई-२६१८/प्र.क्र.८५ /पोल-३**
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० सप्टेंबर, २०२४.

<u>वाचा:-</u>

१) शासन निर्णय,गृह विभाग क्र.सीटीई-२६१८/प्र.क्र.८५/पोल-३,दि.१३.०३.२०२४
२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/२६-ब/ मुदतवाढ/ पारडी,वाठोडा,कपिलनगर/३६/२०१८, दि.३०.०८.२०२४.
३) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.०६.०९.२०२४.

<u>शासन निर्णय:-</u>

शासन निर्णय, दि.२१.०४.२०१८ व्दारे पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या आस्थापनेवरील कळमना पोलीस ठाण्याचे विभाजन करून पारडी पोलीस ठाणे निर्माण करण्यात आले असून, शासन निर्णय दि.२१.०४.२०१८ व्दारे नंदनवन पोलीस ठाण्याचे विभाजन करून वाठोडा पोलीस ठाणे व शासन निर्णय दि.२१.०४.२०१८ व्दारे जरीपटका पोलीस ठाण्याचे विभाजन करून कपीलनगर पोलीस ठाणे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार पोलीस आयुक्त,नागपूर शहर यांच्या आस्थापनेवर नवनिर्मित पोलीस ठाणे,वाठोडा,कपीलनगर व पारडी करिता अनुक्रमे ६०,११७ व १५८ पदे अशी विविध संवर्गातील एकूण ३३५ पदे निर्माण करण्यात आली आहेत.

२. उपरोक्त संदर्भ क्र.१ येथील दि.१३.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे उक्त ३३५ पदांना यापूर्वी दि.०१.०३.२०२४ ते दि.३१.०८.२०२४ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात आली होती. आता उपरोक्त संदर्भ क्र.२ येथील दि.३०.०८.२०२४ रोजीच्या पत्राव्दारे पोलीस महासंचालक कार्यालयाने उक्त पदांना दि.०१.०९.२०२४ पासून पुढील कालावधीसाठी मुदतवाढ देण्याची विनंती केली आहे.

३.	उपरोक्त ३ पोलीस स्टेशनचा पदनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

### १) पोलीस आयुक्त,नागपूर शहर यांच्या आस्थापनेवरील पारडी पोलीस ठाणे करिता नवनिर्मित पदे

| अ. | पदनाम | पद संख्या | पदे निर्माण केल्याचा शासन निर्णय व दिनांक | यापूर्वी मुदतवाढ दिलेला शासन निर्णय व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | ०२ | शासन निर्णय क्र.पीओएस-२६१६/प्र.क्र.१३८/पोल-३, दि.२१.०४.२०१८ | शासन निर्णय क्र.सीटीई-२६१८/प्र.क्र.८५/पोल-३, दि.१३.०३.२०२४ |
| २ | पोलीस उप निरीक्षक | १० | | |
| ३ | सहायक पोलीस उप निरीक्षक | १० | | |
| ४ | पोलीस हवालदार | ४५ | | |
| ५ | पोलीस शिपाई | ८५ | | |
| ६ | चालक पोलीस शिपाई | ०६ | | |
| एकूण | | १५८ | | |

### २) पोलीस आयुक्त,नागपूर शहर यांच्या आस्थापनेवरील वाठोडा पोलीस ठाणे करिता नवनिर्मित पदे

| अ. | पदनाम | पद संख्या | पदे निर्माण केल्याचा शासन निर्णय व दिनांक | यापुर्वी मुदतवाढ दिलेला शासन निर्णय व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | ०२ | शासन निर्णय क्र.पीओएस-२६१६/प्र.क्र.१३९/पोल-३, दि.२१.०४.२०१८ | शासन निर्णय क्र.सीटीई-२६१८/प्र.क्र.८५/पोल-३, दि.१३.०३.२०२४ |
| २ | पोलीस उप निरीक्षक | १२ | | |
| ३ | सहायक पोलीस उप निरीक्षक | ०५ | | |
| ४ | पोलीस हवालदार | १५ | | |
| ५ | पोलीस शिपाई | २० | | |
| ६ | चालक पोलीस शिपाई | ०६ | | |
| एकूण | | ६० | | |

### ३) पोलीस आयुक्त,नागपूर शहर यांच्या आस्थापनेवरील कपिलनगर पोलीस ठाणे करिता नवनिर्मित पदे

| अ. | पदनाम | पद संख्या | पदे निर्माण केल्याचा शासन निर्णय व दिनांक | यापुर्वी मुदतवाढ दिलेला शासन निर्णय व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | पोलीस निरीक्षक | ०२ | शासन निर्णय क्र.पीओएस-२६१६/प्र.क्र.११९/पोल-३,दि.२१.०४.२०१८ | शासन निर्णय क्र.सीटीई-२६१८/प्र.क्र.८५/पोल-३, दि.१३.०३.२०२४ |
| २ | पोलीस उप निरीक्षक | १५ | | |
| ३ | सहायक पोलीस उप निरीक्षक | ०५ | | |
| ४ | पोलीस हवालदार | २० | | |
| ५ | पोलीस शिपाई | ६५ | | |
| ६ | चालक पोलीस शिपाई | ०८ | | |
| ७ | सफाईगार | ०२ | | |
| एकूण | | ११७ | | |

४. आता पोलीस आयुक्त,नागपूर शहर यांच्या आस्थापनेवरील उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या पोलीस स्टेशन पारडी,वाठोडा व कपिलनगर करिता नव्याने निर्माण केलेल्या ३३५ अस्थायी पदांना **दिनांक ०१ सप्टेंबर, २०२४ ते दिनांक २८ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत** खालील अटींच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

१) सहा महिन्यापेक्षा जास्त काळ रिक्त पदे वगळून उर्वरित पदांना मुदतवाढ देण्यात यावी. तसेच पदे ज्या कारणास्तव ज्या अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर केली आहेत, त्याचे पालन करण्यात यावे.

५. उक्त खर्च गृह विभाग मागणी क्रमांक बी-१, २०५५-पोलीस-१०९,जिल्हा पोलीस-१०९ (००) (०१) जिल्हा पोलीस बल या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो **सन २०२४-२५** या वित्तीय वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हा शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक ०६.०९.२०२४ व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०९२०१६१८२७५३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA T BHALWANE

Digitally signed by RAJENDRA T BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA T BHALWANE
Date: 2024.09.20 16:19:00 +05'30'

**( रा.ता.भालवणे )**
**उप सचिव, गृह विभाग**

**प्रत,**

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) पोलीस आयुक्त,नागपूर.
३) महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई .
४) महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६) निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
७) वित्त विभाग (व्यय-७) / वित्तिय सुधारणा-१.
८) निवड नस्ती.